# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र. ३९३ / २०२२

विषय — स्थानिक निवड समितीने शिफारस करून नियुक्त केलेल्या तदर्थ (Adhoc) व तासिका तत्वावरील (CHB) उमेदवारांचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी स्थानिक निवड समितीने शिफारस करून नियुक्त केलेल्या तदर्थ (Adhoc) व तासिका तत्वावरील (CHB) उमेदवारांच्या शिक्षक मान्यतेच्या प्रस्तावास शैक्षणिक विभागाच्या शिक्षक मान्यता कक्षाकडून मान्यता देण्यात येते.

यासंदर्भात शैक्षणिक वर्ष २०२२—२३ साठी स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या उमेदवारांचे निवड समिती अहवाल, शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव शैक्षणिक विभागाकडे सादर करण्याबाबत या विभागाचे परिपत्रक क्र. १६८/२०२२, जा. क्र. सीसीओ/१७५५, दि. ०८/०६/२०२२ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर परिपत्रकामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रस्ताव सादर करण्यासाठी दि. ३१ ऑक्टोबर, २०२२ आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रस्ताव सादर करण्यासाठी दि. ३० सप्टेंबर, २०२२ अशी अंतिम मुदत देण्यात आलेली आहे.

याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२—२३ करीता व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी स्थानिक निवड समितीने शिफारस करून नियुक्त केलेल्या तदर्थ (Adhoc) व तासिका तत्वावरील (CHB) शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव विद्यापीठास ऑनलाईन पध्दतीने दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत भरून आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडे (मान्यता कक्ष) सादर करण्याबाबत मुदतवाढ देण्यात येत आहे. या संदर्भातील इतर अटी/शर्ती परिपत्रक क्र. १६८/२०२२ नुसार राहतील.

गणेशखिंड, पुणे — ४११ ००७.  
जावक क्र. सीसीओ/४२३६  
दि. २० ऑक्टोबर, २०२२.

(डॉ. मुंजाजी रासवे)  
उपकुलसचिव  
शैक्षणिक विभाग (शिक्षक मान्यता कक्ष)

प्रत :

१) मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये

२) मा. संचालक, सर्व मान्यता प्राप्त परिसंस्था